नगरपालिकेच्या विविध कामांसाठी
निविदा मागविण्याच्या / स्वीकारण्याच्या
संदर्भात काही मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग
मंत्रालय, मुंबई ४०००३२
शासन परिपत्रक क्रमांक : जीईएन १०९३/२३६५/प्र.क्र.१२६/९३/नवि-१४
दिनांक: २० ऑक्टोबर, १९९३

## परिपत्रक

नगरपालिका त्यांच्या क्षेत्रातील नवीन रस्ते बांधणे, अस्तित्वात असलेल्या रस्त्यांची सुधारणा, इमारत बांधकाम डागडुजी अशा अनेक बांधकामाच्या व अन्य कामाच्या संदर्भात आराखडे व अंदाजपत्रके तयार करतात. अंदाजपत्रके तयार करतांना चालू वर्षासाठी विहित केलेल्या जिल्हा दर सूचीतील दरांचा अवलंब करण्यात येतो अशा त-हेने तयार केलेले आराखडे व अंदाजपत्रके सक्षम अधिकाऱ्यांकडे तांत्रिक मंजूरीसाठी पाठविण्यांत येतात. सक्षम अधिकारी अशी अंदाजपत्रके चालू वर्षाच्या जिल्हा दर सूचीप्रमाणे किंवा प्रचलित दराप्रमाणे असल्याचे व आराखडे तांत्रिकदृष्ट्या योग्य असल्याचे खातरजमा करुन घेऊन तांत्रिक मंजूरी देतात. अशा मंजूर कामांच्या बाबतीत स्वारस्य असलेल्या कंत्राटदारांकडून जाहिरातीद्वारा निविदा मागविण्यात येतात. स्थानिक परिस्थिती व निविदा अंतिमरित्या मान्य करण्यासाठी लागणारा वेळ व बदलती भावपातळी लक्षात घेता क्वचित मंजूर अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा काही अल्प प्रमाणात जास्त रकमेच्या निविदा प्राप्त होणे शक्य आहे. परंतु काही नगरपालिकांकडे अशा कामांच्या संदर्भात प्राप्त झालेल्या निविदा मंजूर अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा ५० ते ६० टक्क्यापर्यंत जास्त असतात आणि त्या स्वीकारल्या जातात. अशा मोठया रकमेच्या निविदा, प्राप्त निविदांपैकी कमीत कमी दराच्या असल्या तरी, त्या स्वीकारण्याने नगरपालिकेचे नुकसान होते आणि नगरपालिका निधीचा योग्य विनियोग न केल्याबाबत शासनाकडे तक्रारी येतात. अशा प्रकारे नगरपालिकेचे नुकसान न होऊ देणे हे मुख्याधिकाऱ्याचे महत्वाचे कर्तव्य आहे. सबब त्यांनी मंजूर अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा जास्त आहेत, याचे काळजीपूर्वक बाबनिहाय (रेट एनॅलिसिस) परीक्षण करणे अगत्याचे आहे. वर्क ऑर्डर देण्यापूर्वी अशा प्रकारे बारकाईने परीक्षण करणे आणि फेर निविदा मागविण्याबाबत गांभीर्याने विचार करणे इष्ट ठरते. सबब सर्व नगरपालिका मुख्याधिकाऱ्यांना अशा सूचना देण्यांत येत आहेत की, त्यांनी नगरपालिकेच्या विविध कामांसाठी निविदा मागविण्याच्या / स्वीकारण्याच्या संदर्भात खाली नमूद केलेल्या बाबी बारकाईने तपासाव्यात:-

अ) स्पर्धात्मक दरपत्रकातील कमीत कमी दराचे दरपत्रक हे चालू वर्षाच्या जिल्हा दर सूची किंवा मंजूर अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा दहा टक्क्यांनी जास्त असल्यास मंजूर अंदाजपत्रकातील दर व प्राप्त निविदेतील दर यांचे बाबनिहाय बारकाईने परीक्षण करावे व आवश्यक तेथे फेर निविदा मागविण्याबाबत विचार करावा, कारण असे करणे नगरपालिकेच्या हिताचे आहे, व नगरपालिकेचे हित पाहणे, ही मुख्याधिकाऱ्यांची वैयक्तिक जबाबदारी आहे. आवश्यक तर वरिष्ठांकडे अहवाल पाठवावा.

ब) निविदेसाठी जाहिरात अल्प खप नसलेल्या, एकच पानाचे किंवा साप्ताहिक / पाक्षिक नसलेल्या, शक्यतो रोज प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रात द्यावी. तसेच वृत्तपत्रातील प्रत्येक पान क्रमांक दिला जातो व सर्व प्रतीमध्ये जाहिरात छापण्यांत येते, याची खातरजमा करुन घ्यावी.

क) निविदा सूचना वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबरोबरच त्या जास्तीत जास्त कंत्राटदारांना निश्चित पोहचल्या पाहिजेत, यासाठी आवश्यक तर कंत्राटदारांची यादी तयार करुन त्यांना स्वतंत्र पत्राने अशा कामांबाबतच्या निविदेची प्रत पोच देय डाकेने पुरवावी. ज्यामुळे जास्तीत जास्त स्पर्धा होऊन कमीत कमी रकमेची दरपत्रके प्राप्त हातील आणि त्यायोगे नगरपालिकेचा फायदा होईल.

ड) निविदा सादर करण्यासाठी विहित केलेली अंतिम तारीख ही निविदा प्रसिध्द झालेल्या तारखेपासून किमान ७ दिवसानंतरची असावी.

इ) कोणत्याही ठराविक व्यक्तीला किंवा संस्थेला अशी कामे नेहमी देण्यांत येत असल्याचे आढळल्यास अन्य कंत्राटदार ही कामे घेण्यासाठी पुढे येतील असे प्रयत्न करावेत.

फ) अशा कामासाठी शासकीय / निमशासकीय सहकारी संस्थांना प्राधान्य देण्यांत यावे.

ग) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रीय विकास मंडळ यांनी प्रत्येक जिल्हयात निर्मिती केंद्र प्रस्थापित केले असून, या केंद्रामार्फत वरील प्रकारची कामे वाजवी दराने केली जातात. या संस्थेकडे उक्त कामे सुपूर्द करण्याबाबत विचार करावा आणि नगरपालिकांच्या उक्त कामांच्या बाबतीत माहिती त्यांना पोच देय डाकेने किंवा समक्ष देऊन त्यांच्या निविदा प्राप्त होतील असे मुख्याधिकाऱ्यांनी आवर्जून पहावे.

वरील सूचना या मार्गदर्शक असून, त्यातील प्रत्येक बाबीचे मुख्याधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन केल्यास नगरपालिकेचा फायदा होणार आहे. त्यामुळे सर्व मुख्याधिकाऱ्यांनी ते त्यांचे कर्तव्य व जबाबदारी समजून कार्यवाही करावी.

(गो. ल. काळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन